**RNI No. MAHBIL /2009/37831**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १५८ (५)] शुक्रवार, डिसेंबर २, २०१६/अग्रहायण ११, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३१०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ डिसेंबर २०१६

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१५/१७४५/अनौ.सं.क्र. २४/प्र. क्र. ५७३/म-१.— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा अधिनियम क्रमांक ६०) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची खात्री पटत असल्याने महाराष्ट्र शासन याद्वारे भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी गरिबी निर्मूलन मंत्रालय पुरस्कृत "प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत" आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना वाटप करण्यात येणाऱ्या ३० चौ. मी. पर्यंतच्या क्षेत्राच्या सदनिकांच्या वाटपाच्या संबंधातील केवळ पहिल्या दस्ताला उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची एक मधील अनुच्छेद ५ (ग-अ), आणि २५ अन्वये मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात येऊन ते रु. १,००० (रुपये एक हजार फक्त) इतके पुढील अटीस अधीन राहून निश्चित करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत संबंधित लाभार्थी हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांत मोडत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक राहिल तसेच सदर योजनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही अटीचा भंग झाल्यास संबंधित लाभार्थ्यास जणू काही सुरुवातीपासूनच मुद्रांक शुल्कातून माफी न मिळाल्याप्रमाणे संपूर्ण मुद्रांक शुल्क व लागू असलेली दंडाची रक्कम भरावी लागेल.

प्रस्तुत प्रकरणी सक्षम प्राधिकारी म्हणून त्या त्या क्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा प्रांत हे असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. मालिनी वि. शंकर,**
शासनाच्या अपर मुख्य सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st December 2016

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. MUDRANK-2015/1745/U.O.R. 24/C.R. 573/M-1 .— In exercise of the power conferred by Clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act, (LX of 1958), the Government of Maharashatra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduces the stamp duty to Rs. 1000 (Rupees One Thousand only) chargeable under articles 5 (g-a) and 25 in the Schedule I appended to the said Act on the first instrument executed for the purpose of allotment of residential premises admeasuring upto an area of 30 sq. mtrs. to the person belonging to the Economically Weaker Section (EWS) as per the " Pradhan Mantri Awas Yojana -Housing for All (Urban)" which is a Centrally Sponsored Scheme of Ministry of Housing and Urban Poverty Alleviation, Government of India, subject to the following condition :

The Competent authority should certify that the beneficiary falls in Economically Weaker Section (EWS) category and in case of commitment of breach of any of the condition mentioned in the said Scheme, shall make the allottee liable to pay the whole of the stamp duty and penalty, if any, as if there was no reduction in stamp duty from the beginning.

Sub-Divisional Officer (S.D.O.) of respective area will be the Competent authority in this regard.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. MALINI V. SHANKAR,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.